# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः11.12.2025** **वारः गुरुवार**

---

1. भारत आणि इस्रायलच्या पंतप्रधानांच्या दरम्यान धोरणात्मक भागीदारीसंदर्भात दूरध्वनीवरून संवाद
2. भारत-मलेशिया संयुक्त कार्यगटाच्या तिसऱ्या बैठकीत प्रादेशिक आणि जागतिक दहशतवादाच्या परिस्थितीबाबत चर्चा
3. दुबार मतदारांविषयी सरकारच्या शोधणे, वगळणे आणि हद्दपार करणे धोरणाचा केंद्रीय गृहमंत्र्यांकडून पुनरूच्चार
4. नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून इंडिगोच्या गुरूग्राम कॉर्पोरेट कार्यालयात विशेष देखरेख पथकाची स्थापना आणि
5. एफआयएच पुरुष कनिष्ठ हॉकी विश्वचषक स्पर्धेत जर्मनी अजिंक्य

**पंप्र-इस्रायल**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्याशी काल दूरध्वनीवरून संवाद साधला. या दरम्यान उभय देशांदरम्यान असलेल्या धोरणात्मक भागीदारीच्या सातत्यपूर्ण गतीविषयी समाधान व्यक्त करताना, परस्पर फायद्यासाठी हे संबंध आणखी भक्कम करण्याच्या वचनबद्धतेचा पुनरूच्चार केला. दोन्ही नेत्यांनी दहशतवादाचा तीव्र निषेध केला आणि कोणत्याही स्वरुपातल्या दहशतवादासंदर्भात शून्य सहिष्णूता दृष्टिकोनाचा पुनरूच्चार केला.

**पंप्र इटली**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इटलीचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री अँटोनियो ताजानी यांची काल दिल्लीत भेट घेतली. त्यानंतर समाज माध्यमांवर लिहिलेल्या संदेशात, मोदी यांनी भारत-इटलीचे मैत्रीसंबंध अधिक बळकट होत असून, त्यामुळे जागतिक समुदायाला आणि आपल्या लोकांना मोठा लाभ होत असल्याचं म्हटलं आहे. व्यापार, गुंतवणूक, संशोधन, नवोपक्रम, संरक्षण आदी विविध क्षेत्रांमध्ये लागू होणाऱ्या इटली-भारत संयुक्त धोरणात्मक कृती आराखडा 2025-2029 च्या अंमलबजावणीसाठी उभय देशांनी उचललेल्या सक्रिय पुढाकाराचे त्यांनी कौतुक केले आहे.

**पंप्र मलेशिया**

भारत आणि मलेशियानं दहशतवाद आणि आंतरराष्ट्रीय गुन्ह्यांविरोधात सहकार्य बळकट करण्यासाठी दोन्ही देश कटिबद्ध असल्याचं म्हटलं आहे. परराष्ट्र मंत्रालयानं जारी केलेल्या संयुक्त निवेदनामध्ये, भारत-मलेशिया संयुक्त कार्यगटाच्या दहशतवाद आणि आंतरराष्ट्रीय गुन्ह्यांना तोंड देण्यासंदर्भात दिल्लीत झालेल्या तिसऱ्या बैठकीत, दोन्ही देशांनी प्रादेशिक आणि जागतिक दहशतवादाच्या परिस्थितीबाबत चर्चा केल्याचे नमूद केलं आहे. भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयातील दहशतवादविरोधी विभागाचे सचिव विनोद बहाडे आणि मलेशियाच्या गृहमंत्रालयाचे अवर सचिव मोहम्मद अझलन बिन रझाली यांनी बैठकीचे सहअध्यक्षपद भूषवलं. उभय देशांनी दहशतवादाचा निषेध केला आणि व्यापक आणि शाश्वत पद्धतीने दहशतवादाचा सामना करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य भक्कम करण्याच्या गरजेवर भर दिला.

**एसआयआर अमित**

लोकसभेत काल निवडणूक सुधारणा आणि मतदार याद्यांच्या पुनरीक्षण प्रक्रियेवर गंभीर चर्चा झाली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी विरोधकांवर जोरदार टीका करत, मतांसाठी अवैध स्थलांतरीतांचे संरक्षण केल्याचा आरोप केला. देशाचे पंतप्रधान किंवा राज्याचे मुख्यमंत्री ठरवण्याचा घुसखोरांना अधिकार नाही,असं त्यांनी ठणकावलं. पुनरीक्षण कार्यक्रमाचा उद्देश मतदार याद्यांमधून दुबार नोंदी आणि अवैध स्थलातरितांनी वगळून त्यात सुधारणा करणे आहे. दुबार नोंदणीला परवानगी दिल्यास निवडणुकांच्या विश्वासार्हतेला धक्का पोहोचतो असंही त्यांनी नमूद केलं. शिवाय शोधणे, वगळणे आणि हद्दपार करणे या सरकारच्या धोरणाचा त्यांनी पुनरूच्चार केला.

दरम्यान, केरळमध्ये पुनरीक्षण कार्यक्रमातील डिजीटाईज्ड अर्जांची संख्या 2 कोटी 74 लाख 70 हजार 936 झाली आहे. वितरीत केलेल्या अर्जांपैकी ती 98 पूर्णांक 64 शतांश टक्के आहे. मतदारांची गैरहजेरी, मृत्यू, रहिवास बदलणे आणि इतर कारणांनी गोळा न करता आलेल्या अर्जांच्या

संख्येत 23 लाखांपेक्षा जास्त वाढ झाल्याचं केरळचे मुख्य निवडणूक अधिकारी डॉक्टर रतन केळकर यांनी सांगितले. अर्थात ही आकडेवारी अंतिम नसून, अनेक केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी अद्याप डिजीटायझेशनचे काम पूर्ण केलं नसल्याचंही त्यांनी सांगितलं.

**राज्यसभा-चर्चा**

राज्यसभेत आज 'वंदे मातरम' या राष्ट्रगीताच्या 150 व्या वर्धापनदिनानिमित्त चर्चेला पुढे सुरुवात होणार आहे. केंद्रीय मंत्री आणि सभागृह नेते जे.पी. नड्डा यांच्या भाषणाने ही चर्चा समाप्त होईल. यानंतर, राज्यसभेत निवडणूक सुधारणांवर चर्चा सुरू केली जाईल.

**मानवी हक्क दिन**

महिला सक्षमीकरण हा मानवी अधिकाराचा मुख्य स्तंभ आहे असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. जागतिक मानवाधिकार दिनानिमित्त नवी दिल्लीत भारत मंडपम इथं राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या वतीनं काल आयोजित मुख्य समारंभात त्या बोलत होत्या. मानवाधिकारामुळे लोकशाहीला बळ मिळतं असं त्या म्हणाल्या 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' या अंतर्गत मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य मिळालं तसच सरकारच्या विविध योजनांमुळं महिलांची आर्थिक भागीदारी, आत्मनिर्भरता आणि सन्मानाला बळकटी मिळत असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

**राष्ट्रपती मणिपूर**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून दोन दिवसांच्या मणिपूर दौऱ्यावर जात आहेत. दौऱ्यामध्ये, राज्यातल्या विविध औपचारिक आणि विकास कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहे. आज त्या इम्फाळमध्ये दाखल होणार आहेत. राज्याच्या क्रीडा वारसाचे प्रतीक असलेल्या मापल कांगजेइबुंगला भेट देऊ पोलोचा सामना पाहातील. राष्ट्रपती उद्या नुपी लाल स्मारक संकुलाला भेट देतील, तसंच जाहीर सभेला संबोधित करतील.

**डीजीसीए**

गेल्या आठवड्यातील इंडिगो विमानाच्या उड्डाणांना विलंब आणि उड्डाणं रद्द होण्याच्या घटनांमुळे नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने गुरूग्राममधील इंडिगोच्या कॉर्पोरेट कार्यालयात विशेष देखरेख पथक स्थापन केले आहे. महासंचालनालयाने काढलेल्या आदेशानुसार, विमान विलंब, उड्डाणे रद्द होणे यांमुळे प्रवाशांना होणारा त्रास कमी करण्याचा उद्देश यामागे आहे. उपमुख्य उड्डाण संचालन निरीक्षक कॅप्टन विक्रम शर्मा, यांच्या नेतृत्वाखालील आठ सदस्याचं पथक विमान संख्या, कर्मचाऱ्यांची उपलब्धता, कामाचे तास, अनियोजित सुट्या, कॉकपिट आणि केबिन कर्मचाऱ्यांसाठी राखीव कर्माचीारी यांसह प्रमुख कार्यचालन क्षेत्रांवर लक्ष ठेवणार आहे. कंपनीच्या कार्यालयात आळीपाळीने दोन सदस्य उपस्थित राहातील, तर महासंचालनालयाचे अधिकारी ऐश्वीर सिंह आणि मणी भूषण दररोज रद्द विमान संख्या, परतावा प्रक्रिया, प्रत्यक्ष कार्यचालन, प्रवासी नुकसान भरपाई आणि सामानाचे वितरण यांवर लक्ष देणार आहेत.

**विकास बँक**

आशिया विकास बँकेने जाहीर केलेल्या आशिया आणि पॅसिफिक ग्रोथ आऊटलूक अहवालानुसार, चालू आर्थिक वर्षासाठी भारताच्या विकासाचा अंदाज साडेसहा टक्क्यांवरून वाढवून 7 पूर्णांक 2 दशांश टक्के केला आहे. जुलै ते सप्टेंबर या तिमाहीत उल्लेखनीय वाढ नोंदवल्यानंतर आगामी आर्थिक वर्षांसाठी चांगल्या असलेल्या शक्यतामुळे 7 शतांश टक्के गुणांची वाढ झाली आहे. बहुपक्षीय विकास बँकेने पुढल्या आर्थिक वर्षासाठीचा अंदाज साडेसहा टक्क्यांवर कायम ठेवला आहे.

**वैष्णव-रेल्वे**

भारतीय रेल्वेनं 2023-24 या आर्थिक वर्षात प्रवाशांना प्रवास परवडणारा करण्यासाठी 60 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त सबसिडी दिली आहे. लोकसभेत पुरवणी प्रश्नाला काल उत्तर देताना रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं की, प्रवाशांना दिलेली सबसिडी ही प्रवासी प्रवासाच्या एकंदर खर्चाच्या 45 टक्के आहे. आणि भारतीय रेल्वेचे तिकीट दर जगातील सर्वात कमी दरांपैकी एक आहे. शेजारील देशांच्या तुलनेत भारत आपल्या प्रवाशांना सर्वात स्वस्त वाहतूक सुविधा देत असल्याचंही वैष्णव यांनी नमूद केलं.

**शिल्प दीदी**

केंद्र सरकारच्या शिल्प दीदी उपक्रमामुळे महिला उद्योजकांना त्यांच्या उत्पन्नात वृद्धी करण्यास मदत झाल्याचं केंद्रीय वस्त्रोद्योग सचिव नीलम शमी राव यांनी म्हटलं आहे. यामध्ये काही शिल्प दीदींनी पाच लाख रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न मिळवल्याचं त्यांनी नमूद केलं. दिल्लीत राष्ट्रीय हस्तकला आणि वारसा सप्ताहात त्या बोलत होत्या. या उपक्रमामुळे महिला कारागीरांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी सरकारने व्यासपीठ उपलब्ध करून दिले असल्याचंही त्या म्हणाल्या.

**<u>दीपावली</u>**

भारतीयांच्या आवडत्या दिवाळी सणाचा समावेश युनेस्कोच्या अमूर्त सांस्कृतिक वारसा प्रतिनिधी यादीत झाला आहे. त्याविषयी केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी समाद माध्यमावरील संदेशातून आनंद व्यक्त केला आहे. आधुनिक युगात भारताच्या प्राचीन सांस्कृति मूल्यांचं महत्त्व दर्शवणारा हा समावेश असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. तर कुटुंब कल्याण मंत्री जेपी नड्डा, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयंशकर यांनीही या समावेशाविषयी आनंद व्यक्त केला आहे.

**<u>हॉकी अंतिम सामना</u>**

चेन्नई इथं काल रात्री झालेल्या एफआयएच पुरुष कनिष्ठ हॉकी विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात, गतविजेत्या जर्मनीनं निर्धारित वेळेत सामना 1-1 असा बरोबरीत सुटल्यानंतर शूट-आऊटमध्ये स्पेनचा 3-2 असा पराभव करून आपलं आठवं विजेतेपद पटकावलं. त्यापूर्वी काल, यजमान भारतानं अर्जेंटिनावर 4-2 असा विजय मिळवून कास्यपदक पटकावलं. तर, बेल्जियमनं शूट-आऊटमध्ये नेदरलँड्सचा 4-3 असा पराभव करून स्पर्धेत पाचवं स्थान मिळवलं.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि दक्षिण आफ्रिका दरम्यान वीस षटकांच्या पाच सामन्यांच्या मालिकेतील  दुसरा सामना आज न्यू चंदीगड इथं खेळला जाणार आहे. संध्याकाळी 7 वाजता सामना सुरु होणार आहे. मालिकेतील पहिला सामना जिंकून भारतानं आघाडी घेतली आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.